|| श्रीनाथ समर्थ ||

# श्रीसद्गुरू विजय स्तोत्र

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः।
गुरुः साक्षात्परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः॥

## || अथश्री सद्गुरू विजय स्तोत्रम् ||

विश्वांतील सर्व सुखाचे समाधान । ते तो सद्गुरुनाथ दर्शन ।

सकळ साधनांहून श्रेष्ठ साधन । नित्य गुरुवंदन सद्भावे ।।१।।

श्रीगुरूंचे महिमान । आकलना कोणतेही न साधन ।

सर्वश्रेष्ठ साधन नमन । म्हणोनी नाथा वंदन हे ।।२।।

गुरू परब्रह्म शिव विष्णू विधाता । गुरूची माता सद्गुरू पिता ।

तोचि आप्त मित्र भ्राता सुखकर्ता । रिद्धिसिद्धिदाता श्रीगुरू ।।३।।

न करिता अभ्यास सायास । वेदोपनिषदाचे गुह्य खास ।

उकली सर्वशास्त्र विद्या कळास । त्या गुरुकृपेस वानु केवी ।।४।।

गुरुपायी होता अनन्यशरण । गाता निर्विकल्प गुरू महिमान ।

प्रेमे द्रवला सद्गुरू दयाघन । मज धीर ये वर्णाया ।।५।।

सद्गुरू तो पुढारी धुरंधर । भवघाट उतरवी झरझर ।

पार करवी दुष्कर्म डोंगर । धीर दे कर धरोनिया ।।६।।

भाग्यविलासी ती सद्गुरुभक्ती । सकल उल्हास ती सद्गुरुप्रीती ।

विजय यशश्री सद्गुरू संगती । पुरुषार्थ गुरुपदी सर्व ते ।।७।।

जन्मोजन्मीचे पुण्यसंचिती । तेणे भाग्ये होय सद्गुरुभक्ती ।

तेव्हाच लाभते संतसंगती । सुलभ भक्ती सत्संगे ।।८।।

गुरुभक्ती परमार्थाची खाण । पालटे जीववृत्ती सद्गुरुवचन ।

'जय गुरुनाथ' मंत्र महान । धाके शरण हो देवादीक ।।९।।

श्रीनाथपंथ परपंरा अनिवार । अपरिमित लीलाशक्ती अवतार ।

गुरुगृह परिसर गुरू परिवार । तो भक्तिसंसार सुखकारी ।।१०।।

गुरुशब्दाचा ऐका भावार्थ । 'गु' कार म्हणिजे अज्ञान तमांध ।

तयाचे निरसन 'रू' कार सार्थ । ज्ञान प्रकाशार्थ गुरुभक्ती ।।११।।

परमार्थाचे मुख्यसाधन । गोविन्द सद्गुरू नाम पावन ।

नामभजन विधान ना बंधन । पूर्ण सुखसंवेदन नामी ।।१२।।

सुखदुःख द्वंद्व जन्मासोबत । त्यांत शोधावे आपुले स्वहीत ।

जतन करावी भक्ती प्रीत । सद्‌गुरूनाथ चरणाची ।।१३।।

भजनानंदी सर्व सुख । तेथ निवारण सर्व दुःख ।

सकळ कल्याणकारी तेची एक । भक्तिसुखचि जाणावे ।।१४।।

सद्गुरू तूंच देवाधिदेव । चैतन्य पूर्ण सुखसर्वस्व ।

जो लिहावा हा स्वानुभव । तो मद्भावचि होवावा ।।१५।।

सुपंथ तेचि गुरुपूजन । शास्त्र तेचि गुरुवचन ।

त्या परते नाही चिंतन यजन । सुखसंजीवन तो श्रीगुरू ।।१६।।

श्रीगुरूसी नाही नामरूपगुण । परी लीलाविलास तो सगुण ।

वर्णिता थकले सुरमुनीजन । केवी वर्णन ते घडावे ।।१७।।

गुरुवचनी सर्व सावधपण । सद्गुरू तोची ब्रह्मसमान ।

गुरुवाक्यची ब्रह्माचे प्रमाण । अन्यथा कोण पुसे ब्रह्मा ।।१८।।

अवघा भाव अवघा देव । एकाग्रपणी पूजिता गुरुराव ।
निश्चयांत अनन्य भक्तिभाव । अद्वितीय एकमेव गुरू ।।१९।।

ध्यानमूळ मंत्रमूळ गुरू धनी । पूजा मूळ मोक्षमूळ सद्गुरू जाणी ।
संपूर्ण ज्ञानाचे आकळणी । गुरूविन कोणी नाही ।।२०।।

सद्गुरू मुखीचे प्रेमवचन । त्यापुढती सर्वसुखे लहान ।
त्या प्रेमात हो जन्मोजन्म तहान । तृप्त, जन्ममरण तुटे ।।२१।।

सद्गुरू चिंतन हा एकची आधार । संसारीया उतराया भवपार ।
सद्गुरू तो सर्व शास्त्रांचे शास्त्र । तारक सद्गुरू मंत्र हा ।।२२।।

सद्‌गुरूरूप ते सदा प्रसन्न । सद्गुरू नित्यचि सस्मितवदन ।
श्रद्धा मोक्षदायिनी खाण । प्रसन्नपण निजबोधाचे ।।२३।।

सद्गुरू तुझी सत्ता सार्वभौम । भुईसपाट करी सर्व रजतम ।
तूंची चालते बोलते परब्रह्म । अजरामर नाम तुझे ।।२४।।

सद्गुरू तो एकमेवाद्वितीय । एकच नानाकारी करी तन्मय ।
अलख निरंजन सर्वत्र अद्वय । स्वानंदमय भरलासे ।।२५।।

जो गुरू समर्थ शिष्यबोधा । सावध बुद्धि ब्रह्मानंदी डुलता ।
अंहंकारी गुरूपण न बाधी चित्ता । संकल्प विकल्पता ना मनी ।।२६।।

जो गुरू शिष्या पाहे पुत्रापरी । प्रसंगी शिष्याची सेवाही करी ।
शिष्याप्रतीही देवभाव अंतरी । धन्य अवतारी तो सद्गुरू ।।२७।।

धन्य सद्गुरू धुरंधर पावन । निवारी दयेने दुर्गुण व्यसन ।
भवपैलपार करी शुद्ध करून । चोरहि अंगिकारून धन्य करी ।।२८।।

भगवंत तोचि चैतन्यघन । सद्गुरुसेवा ही निजात्मखूण ।

तीच अभेद मुक्तीची ओळखण । विसर मी-तूपण साधका ।।२९।।

परी सद्‌गुरू तो आगळाचि पिता । जो जन्ममृत्यू निवारिता ।

पंचभूतांचा शुद्धीकर्ता । भवभयबाधा निवारी ।।३०।।

सद्‌गुरू तोचि निजप्रेमे माता । देइ वाढवी तादात्म्यता ।

प्रेमे सत्शिष्या तृषाक्रान्ता । निर्विकल्पता दे वर्षुनी ।।३१।।

सद्‌गुरुसी जो समजे साधारण । तयाचे महानरकी अधःपतन ।

तो शिष्यचि जाणा पशुसमान । विश्वासघात महान पाप त्या ।।३२।।

देखती सद्‌गुरुसी प्राकृतयष्टी । गुरूविशी कुतर्की करिती गोष्टी ।

तेथ वाद करी उद्धट तोंडपिटी । तो शिष्य दृष्टी पाहो नये ।।३३।।

धन्य सद्गुरूनाथ चित्सागर । ज्याचा सुरमुनीवेदा न कळे पार ।

संत देवादिक ज्याचे अवतार । रूपे अपार अगाध लीला ।।३४।।

सद्गुरू तोचि वेद शास्त्र पुराण । मीपण दुर्गुणांचे व्हावया निरसन ।

लोभमोहविषयी गुणदोष पूर्ण । सांगे नेमस्तपण स्वधर्मी ।।३५।।

संत सद्गुरू हे ब्रह्मचि जाणा । अविद्ये जन वदती विकल्पना ।

हरिभक्तांचा सत्संग जयांना । घेई निर्दोषपणा क्रमाने ।।३६।।

संतजीवन नोहे कागदशाई । ते तो स्वात्मानुभवाची नवलाई ।

बौद्धिक तर्ककुतर्क व्यर्थ ते ठायी । अविवेकी घाई करूं नये ।।३७।।

सद्गुरू चिद्धन सर्वत्र भरला । तेथ स्वरूपानुसंधान लीला ।

मनबुद्धीपर मती सकला । म्हणुनी अनाकला गुरुलीला ।।३८।।

सद्‌गुरू योगी गुणातीत । जो पूर्णानंदे भरून वाहत ।

तेथे नाही सुखदुःखाची मात । देही वर्तत सहजपणी ।।३९।।

जे जे जगती विभुती निर्दोष । ती ती ईश्वरमूर्ती निःशेष ।

सद्गुरू स्वरूप ते त्यांत विशेष । तो सर्वेश सर्वात्मक ।।४०।।

जैसे वृक्ष सापडे बीजासवे । तैसा विश्वात्मक सद्गुरुभावे ।

सद्‌गुरू प्रगट सहज स्वभावे । हे आकळावे आत्मज्ञान ।।४१।।

सद्गुरू तोचि देव बृहस्पती । सद्गुरू तोची अवधूत यती ।

सद्गुरू भवसमर सेनापती । सरितापती तो अथांग ।।४२।।

सद्गुरू तोचि कामधेनु तृप्तीनिधान । सद्गुरू अमृतकुंभजीवनदान ।

सद्गुरू तोचि कल्पद्रुम परिपूर्ण । सर्व समसमान सद्गुरू ।।४३।।

सद्गुरुयोग नियमांचा धर्म । संसार गजकेसरी पराक्रम ।

सद्गुरू तोचि पुरुषोत्तम । सद्गुरुची सार्वभौम सत्ता ।।४४।।

सद्‌गुरू तो श्रेयस कीर्ती । सद्‌गुरू परमोदार संपत्ती ।

सद्‌गुरूचि मेधा प्रज्ञा प्रतिभा ती । ऋतंभरा ती सद्गुरू ।।४५।।

सद्गुरूचे ठायीच काव्यसिद्धी । सद्गुरू सर्व कार्य शक्ती ।

सद्गुरूपायी धर्म ज्ञान नीति । सद्गुरू स्तुती अपार ।।४६।।

सर्व प्राणिमात्रांकुराचे बीज । तेचि सद्‌गुरूचे निजवर्म सहज ।

सान थोर उच्च नीच । ज्ञानिया ज्ञानसंचय तो ।।४७।।

सूर्य एकला तळपे गगनी । त्याची प्रभा फाके त्रिभुवनी ।

तैसा सद्गुरु एकमेवाद्वितीयपणी । जनीविजनी व्याप्त तो ।।४८।।

जो नित्य स्वरूपी समाधानी । सद्गुरू स्वयेचि सत्य समानी ।

जेणे वाक्ये ब्रह्म सप्रमाणी । वत्सल मातेहुनी सद्गुरू ।।४९।।

श्रीदेवनाथ गुरू सच्चिदसुखघन । ते नाम जपता चिरंतन ।

सकळ पापांचे निराकरण । सद्‌गुरू स्मरण धन्य ते ।।५०।।

सद्गुरू निवारी वज्रास्त्रही । सद्‌गुरू तोडी कालचक्रही ।

सद्‌गुरू नामे सहस्त्रावधीही । करूणासमुद्रही सबाह्य ।।५१।।

सर्व व्यापक तो सद्‌गुरूनाथ । सर्वगत वाट चुकूं न देत ।

ध्याता काम क्रोध लोभा विरहित । विदेहता देत देही या ।।५२।।

सद्‌गुरू जन्मोजन्मीचा तात-मात । जगजनक पुत्र मित्र आप्त ।

सद्‌गुरू कुळस्वामी कुलदैवत । जन्ममरण चुकवीत सद्गुरू ।।५३।।

परमात्मा सद्गुरूनाथ एकला । चराचरी नानाकारे भरला ।

तोचि स्थिर वा चलनवलनाला । सुष्ट दुष्ट जगाला खेळवी ।।५४।।

सद्गुरू तोचि जीवजिवलग । दावी सर्व सुखदायी मार्ग ।

अज्ञान तमाचा आणी उबग । दावी सवेग मार्ग मुक्तीचा ।।५५।।

सद्गुरू ज्ञानमय परमेश्वर । सर्व सृष्टिचा नियंता ईश्वर ।

सद्गुरू द्वार ते ज्ञानाचे माहेर । संत वेदशास्त्र सांगत ।।५६।।

सद्गुरू संकटी भक्ता साह्यकारी । अपूर्व जिव्हाळा भक्त कैवारी ।

कैवल्याचा पुतळाच नांदे भूवरी । पांडवा विवरी रक्षिले ।।५७।।

निर्मळ शुद्ध ते सद्गुरुस्वरूप । तेथ कैसे धर्माधर्म माप ।

जैसे पहावे त्यानुरूप । दावी स्वरूप निजलीले ।।५८।।

गुरुकृपेचा शीत वसंत समीर । झडवी दोषिक जीर्ण कल्पनाभार ।

म्हणुनी बोला फुटती नवांकुर । प्रेमरस निर्झर सद्गुरू ।।५९।।

सद्गुरू तोचि स्वये ज्ञान । शास्त्रार्थ पारंगत परिपूर्ण ।

कीर्तन कीर्ती सर्वत्र सुजन । कर्मशास्त्रज्ञान अपूर्व ते ।।६०।।

सद्‌गुरू दासांचाही दास उदार । भक्तांचा कैवारी प्रियकर ।

विषयी भवार्णवी एक आधार । जोडावी सोयरीक तयासी ।।६१।।

ऐसा सद्‌गुरू निजप्रकाश । पाहतेपणाचा करी ग्रास ।

प्रपंची घडवी परमार्थास । उघडी उदास दृष्टी हो ।।६२।।

सर्व मुक्तीचे ते माहेर । जाणावे सद्गुरुचे सुखमंदिर ।

प्रेमळांचा परम भावविस्तार । गुर्वाश्रम उघडे द्वार ज्ञानाचे ।।६३।।

सद्‌गुरू तूंचि सगुण निर्गुण । निराकार तू आनंदघन ।

परब्रह्म सद्गुरो हे सनातन । आदिकारण सर्वा तू ।।६४।।

तो सद्गुरू सदैव भक्तांकित । भक्ता सबाह्य प्रेमे नांदत ।

अमूर्त होऊनी मधुर मूर्त । वीर भक्त साह्यकारी ।।६५।।

प्रेमभावे जोडावा सद्गुरुरमण । तोचि चिदानंदघन संपूर्ण ।

तोच सुखवी स्वानंदी सुखधन । गुरुसेवे पूर्ण प्रतिष्ठा ती ।।६६।।

सद्‌गुरु तो जाणा ज्ञानरवी । रवी प्रकाशता सर्व प्रकाशवी ।

सद्गुरुची तैसी सर्व प्रेमठेवी । ती उपभोगावी निरंकुशा ।।६७।।

सूर्य कधीच न ताजा शिळा । अग्नी कधीच न सोवळा ओवळा ।

गुरुसंगतीचाही अखंड सुखावळा । अंतर्बाह्य सोहळा प्रेमाचा ।।६८।।

सद्गुरू हृदय निखळ प्रेमळ । प्रबळ वरदायी करकमळ ।

अंतर्बाह्य पापांचे क्षालन समूळ । अमंगळाचे मंगळ श्रीगुरू ।।६९।।

म्हणुनी ध्यावा तो परमात्मा । विश्वी पहावे गुरू पुरुषोत्तमा ।

सर्वासर्वी आठवा सद्गुरुमहिमा । नित मंगलधामा चिंतावे ।।७०।।

सद्गुरू तो जळी-स्थळी-पाषाणी । सर्वात्मक तो त्रिभुवनी ।

ऐसेच धर्मकाजाकारणी । येती अवतरूनी भूलोकी ।।७१।।

जो सर्वदा नामरूपातीत । वेदाही न कळे स्वरूप अंत ।

तो सद्गुरुरूपे अवतरत । पुरवीत भक्तसंकल्पा ।।७२।।

काळावरी विजेता सद्गुरू एकला । दुजा न कोणी जिंकी काळाला ।

धरिता सत्संगी सम्यक विवेकाला । सद्गुरू अनुभूतीला जाणावे ।।७३।।

सत्यप्रतिज्ञ श्रीसद्गुरुनाथ । वचना कैसे अंतर तेथ ।

सहज पूर्ण गुरू सर्वव्याप्त । उद्वेगरहित नाथ हा ।।७४।।

सद्गुरूदुष्कर्ममोचन कर्ता । मौन व्याख्यानी ज्ञानदाता ।

तूच छिन्न संशयकर्ता । अक्षयसुखदाता गोविन्दा ।।७५।।

गुरूचि माता गुरूचि पिता । सद्गुरूवाचुन दुजा न त्राता ।

सत्य सत्य सद्गुरूदाता । कृतकृत्यता श्रीसद्गुरू ।।७६।।

निजाचा सांभाळ करि निर्धार । गुरुकृपा ती अखंड साचार ।

सद्गुरू सकळ साराचे सार । भाव निरंतर धरावा ।।७७।।

सद्गुरू अंतर्यामी शाश्वत देव । सद्गुरू तोचि विश्वेशराव ।

ब्रह्मचि देहधरी भक्तप्रेमास्तव । अखंड श्रद्धाभाव धरावा ।।७८।।

तूंचि सद्गुरू व्याप्त चराचरी । परी दृष्टी न दिससी रेसभरी ।

जेथ थकती वेद वैखरी । कैसे म्यां पामरी वर्णावे ।।७९।।

सद्गुरू कृपाप्रसादास्तव । पिसे असती देवता देव ।

मासे होऊनी करिती धावाधाव । धरूनी हाव यमुनाजळी ।।८०।।

सद्गुरू तोची व्याप्त त्रिभुवनी । सर्व जगद्रूपी तोच भरूनी ।

खेळे खेळवी विश्वा निजज्ञानी । प्रेमभावे अखंडपणी पुजावा ।।८१।।

सद्गुरूच्या भक्तिविहीन। जे घडते ते हो प्रदर्शन।

क्षणक्षण सद्गुरू ध्यान दर्शन। गुरुभक्ती शुद्धलक्षण ते ।।८२।।

सद्गुरू तुमचेनि अस्तित्व मला। सद्गुरू तुम्हीच धनी मजला।

सद्‌गुरू डोळीयाचा डोळा भला। नेऊनी निजपदाला बैसवी ।।८३।।

डोळीयाची तूंच दृष्टी सुंदरा। तूंच पाठीराखा सद्‌गुरू भास्करा।

मग कोठेही नुरत अंधारा। चरित्र श्रृंगारा काय उणे ।।८४।।

सद्गुरू गुणगान ते अलौकिक। नित्यसत्या स्पर्श न मायिक।

वांछिती विषय कर्मठ मूर्ख। कैसे भोगसुख सत्यरूपी ।।८५।।

जयाची लीला संपवी असत्यता। मावळे द्वैतकर्ता तत्वता।

वंदन ऐशी सद्गुरू सत्ता। शाब्दिक दांभिकता नुपजे कधी ।।८६।।

सद्गुरू षड्‌गुणैश्वर्य संपन्न। यश-श्री-औदार्य-वैराग्य ज्ञान।

त्याचे पायी होता समर्पण। तोचि अपूर्ण पूर्ण करी ।।८७।।

अनंत उपकारी श्रीगुरुराया। भवार्णवीचे तारु निर्भया।

सर्व व्याधीहर सद्गुरुराया। दुरित वाराया कृपाळु ।।८८।।

गुरुचरणी जाता शरण। तोच करवितो निरूपण।

करवील कृपे तोचि कार्य पूर्ण। प्रसाद देऊन महासुखी ।।८९।।

सद्‌गुरुकृपे हो ज्ञानप्राप्ती। सद्‌गुरुकृपेने लाभे मुक्ती।

पूर्व पुण्याईने लाभे गुरुसंगती। गुरुविन कल्पांतीही ज्ञान नोहे ।।९०।।

सद्गुरूची सकळ कळा बळ। सद्‌गुरूची झाडी दोषी चित्तमळ।

सद्‌गुरूविना अवघी निष्फळ। विकळ विफळ साधना ।।९१।।

अगाध ऐसी सद्‌गुरू महती। सद्गुरू निवारी नाना पातके ती।

जैसी हनुमंता बघुनी भूते पळती । तैसी पापे जळती गुरूकृपे ॥९२॥

सद्गुरू कृपे प्रगटे ईश्वर । सद्गुरुकृपेने हो भवपैलपार ।

सद्गुरूचि मुक्तीचे माहेर । दाता अभयवर श्रीगुरू ॥९३॥

गुरुउपदेश हे प्रेमगंगास्नान । अन्यथा अवघा अहंकारी शीण ।

नुरवी प्रेमे कर्माकर्मबंधन । नुरे मी-तूपण गुरुकृपे ॥९४॥

गुरुसेवे लाभे संशुद्धी बळ । जेणे झडती चित्तमळ ।

वैराग्य प्राप्ती घडे अढळ । सत्त्व प्रबळ होतसे ॥९५॥

सद्गुरुप्रेमी जडले ज्याचे मन । त्याचे तेच योगयाग साधन ।

तेच समस्त कर्मानुष्ठान । होय शोधन चित्तवृत्तींचे ॥९६॥

जेथे गुरुकृपेचा महाप्रसाद । तेथे सदासर्वदा आनंदीआनंद ।

रोमरोमी लेणे आत्मसुखद । सोहाळे शुभद योगाचे ॥९७॥

गुरुकृपेचा महिमा अगाध । न मागता कोड पुरवीत ।

अंगणीचे तरू कल्पवृक्ष होत । साफल्य लभत कल्पित ॥९८॥

म्हणूनी सद्गुरू जो स्वहित दाता । त्या चरणी श्रद्धे विश्वासता ।

कृपे गुरू स्वमुखी अनुग्रहीता । न हो बाधा अहंकारी ॥९९॥

सद्गुरु चरणी अनन्य शरण । तेणेचि सर्वथा समाधान ।

मन-बुद्धीसी घडे आकलन । ध्येय-ध्याता-ध्यान एक हो ॥१००॥

असो ज्ञानी विवेके शांती पावती । अज्ञानी दुष्कर्मी दुःखी होती ।

म्हणुनी पूर्णज्ञानी सद्गुरुप्रती । घ्यावी शरणागती अनन्य ॥१०१॥

गुरुकृपा विरक्तीचा निधी । सद्गुरू चरणी जडे अनुरक्ती ।

तुटे संसार चिंता ती । परमार्थ फलप्राप्ती हो ॥१०२॥

सद्गुरू कृपा प्रताप गहने। नानापरी लभत उपदेशान्जने।
विवेकोद्यानी विहरता प्रेमाने। श्रुतिसार सुमने गवसली ॥१०३॥
सद्गुरू प्रसादे होई प्रारब्ध शुद्ध। सेवियेली ती विभुती सिद्ध।
वचन नाथांचे अद्भुत अनिरुद्ध। नेणे प्रबुद्ध ही नाथकृपा ॥१०४॥
गुरू अवज्ञा तो आत्मघात। गुरू अवमानी महा अनर्थ।
वेदपुराणी हाचि सिद्धांत। देहबेडी तुटत गुरुबोधे ॥१०५॥
गुरुवाक्य कृपेची अपार महती। आवश्यक शुद्ध शिष्यप्रज्ञा ती।
शिष्य श्रद्धामय सात्त्विक मती। तरीच गुरुपदी स्थिरावे ॥१०६॥
म्हणून गुरुअनुग्रह हे सार्थजनन। सद्गुरू तोची नाते गोते पूर्ण।
धीर देऊन सुसंस्कारित जीवन। ते पूर्ण लाभे दयाळा ॥१०७॥
धन्य सद्गुरुसंगती सद्गुरुभजन। सेवे मोक्ष उभा पुढे कर जोडून।
अखंड निष्ठा सद्गुरू स्मरण। मुक्ती सुख पूर्ण सत्शिष्या ॥१०८॥
गुरूनाथांचे प्रेमळ मार्गदर्शन। देइ स्थिरता अधिकारही पूर्ण।
अज्ञान निरासे परब्रह्म प्रकाशून। कल्पनातीत अनन्य सुख ते ॥१०९॥
गोडीच्या सुखाला सर्वदा। झोंबती मुंगळे भुलुनी पदार्था।
गुरूकृपासुख येई ज्याचे हाता। त्याचा घातकर्ता मूर्ख ठरे ॥११०॥
गुरुकृपेने पळे अभिमान। गुरुकृपेची होई भेद निरसन।
जेथ गुरुकृपेचे भजनपूजन। ते ज्ञान स्फुरोन प्रगटते ॥१११॥
धन्य धन्य गुरुनाथ कृपा। जन्मोजन्मीचे निवारी पापा।
कैसा वानू त्या कीर्तिप्रतापा। प्रीति त्रितापा वारिते ॥११२॥
सद्गुरू सेवे प्रेम प्रबोधन। गुरुसेवे जीवा उद्बोधन।

गुरुकृपेचि कर्म धर्म प्रवर्तन । जिवीचे कल्याण गुरुलीले ।।११३।।

सद्भावे निभवावा गुरुभक्तीनेम । सद्गुरूनाथ कृपे हो योगक्षेम ।

सद्गुरूप्रेमचि सकळ धर्म कर्म । सद्गुरू पूर्णकाम कृपा हो ।।११४।।

भक्ती ज्ञान दोन्ही मार्ग कठीण । परी लाभती न गुरुसंगतीविण ।

सद्‌गुरूभक्तीच ज्ञान विघ्ने निवारून । कल्पविकल्पन तोडीते ।।११५।।

मन थोर होते गुरुपायासी । म्हणुनी अखंड जडावे गुरुपदासी ।

थोर भाग्याने स्वयेचि रतले सद्गुरुसी । तरी परमार्थासी काय उणे ।।११६।।

कवणा न कळे गुरुमहिमान । ते सबाह्यांतर प्रांजळपण ।

भक्तीचे निर्मळ घर स्वये होऊन । नाथार्पण करावे वसावया ।।११७।।

सद्गुरू मुखीचे जे जे बोल । तेचि स्वये ईश्वर बोले सकळ ।

जीवन्मुक्ताची वाणीही केवळ । निजरुपी निश्चळ करितसे ।।११८।।

सद्‌गुरुपूजन हे वृत्ती शुद्धीकरण । धर्मकर्म वेदोक्त ज्ञान ।

धर्मशास्त्र शिकवी प्रेम परिपूर्ण । त्याविन पूजन व्यर्थचि ।।११९।।

करावे सदैव सद्गुरूस्मरण । तेणे सर्व विघ्ने होती निर्विघ्न ।

गुर्वाज्ञेचे न व्हावे उल्लंघन । परम समाधान पावसी ।।१२०।।

श्रवण करिता गुरुकथासार । सद्‌गुरू भावे रंगवी सुंदर ।

तेणे दुःखरुप हा संसार । सुखरूप निरंतर होतसे ।।१२१।।

सर्व रोगांचे गुरुकृपा औषध । स्थिती निवारिते रोगबद्ध ।

काया वाचा मन करी शुद्ध । सुदृढ वरद अशक्ता ।।१२२।।

सद्गुरूसेवा हेच हो जीवित व्रत । थंडी उन्हे वर्षा कितीही गाजत ।

अथवा सर्व पंचमहाभूते खवळत । गुरुभक्ती शांत निर्विघ्न हो ।।१२३।।

सद्गुरुसी निस्वार्थपणी शरण जाता । अवघी कर्मबंधने तुटती सहजता ।

लाभते सबाह्याभ्यंतर शुचिता । धर्म धर्मार्थता सार्थ हो ।।१२४।।

धन्य धन्य ती भाग्य खूण । जया लाभती सद्गुरूचरण ।

वरी होता गुरुकृपा पूर्ण । काय उणेपण जगी त्या ।।१२५।।

गुर्वाज्ञापालन हीच कृतार्थता । धन्य होती त्याचे मातापिता ।

तेणे संसारीहि सुखरूपता । उद्धारक समस्ता गुर्वाज्ञा ।।१२६।।

सद्गुरू वचनाचे ते एकाक्षर । अमृताहुनीही अति मधुर ।

सौभाग्ये पावन हो श्रवणद्वार । आनंदरसभर जीवित हो ।।१२७।।

गुर्वाज्ञापालनी थोर धर्माचरण । तेणेचि यश कीर्ति कल्याण ।

सर्वथा विजयश्री ती स्वयंपूर्ण । स्वये येऊन वरितसे ।।१२८।।

जयासी नाही सद्‌गुरुभक्ती । वर ते कितीही दाविती ।

तयासी कधीही न प्रेमफलप्राप्ती । कैसी विरक्ती येईल ।।१२९।।

हृदयी जागता गुरुभक्तिभाव । येई हृदयी देवेश्वरानुभव ।

जगतीची तुच्छ प्रतिष्ठा वैभव । निंद्य उठाठेव त्यापुढे ।।१३०।।

गुरूचे तीक्ष्ण शस्त्रही उठता । तेणे ऐक्यचि लाभे दृढता ।

करील निश्चित भवच्छेदा । सद्विद्याबोधकताच ती ।।१३१।।

जन्म-मरणाचे कठिण ते फेरे । फिरवी जीवा संसारी जबरे ।

तीही भ्रमंती गुरुकृपे सरे । कलियुगी खरे गुरुनाम ।।१३२।।

जिव्हाळ्याची धरावी गुरुभक्ती । तेथ काळाचीही न चाले शक्ती ।

गुरुपायीच जाणा अवघ्या मुक्ती । वास करिती निरंतर ।।१३३।।

सद्‌गुरू कामधेनू वत्स मी । बोध रसने भरे गुरुप्रेमी ।

अविश्रांत रमता गुरुसेवा कर्मी । स्वानंद पान्हा नामी नाथांचे ।।१३४।।

गुरुभक्तीचे स्वानंद उड्डाण । अंगी शांतीचे दिव्य वसन ।

कायाभाव शुद्ध करी गुरुभजन । सत्त्व समाधान गुरुध्यानी ।।१३५।।

अभिनव धरिता सत्संगती । अनंत सुखराशी पावती ।

गुरुकृपे निंद्यही वंद्य होती । निष्पाप करिती सद्गुरू ।।१३६।।

व्रत साधने ती गुर्वाज्ञेविना । करिता विघ्ने उपजती नाना ।

साधू वा श्रेष्ठाज्ञे तीच साधना । अति पावना सिद्धीदायी ।।१३७।।

सद्गुरू जिव्हाळा जयाचे पोटी । तया ठावी आत्मप्रत्ययी गोष्टी ।

प्रेमळासी भेटता प्रेमळ दिठी । अंतरी निजभेटी परस्पर ।।१३८।।

मन जरी घडवी अध:पतन । चालवावे नेटे सद्गुरुचिंतन ।

सद्गुरूच भवसंकटी नेतो निभवुन । चिंतनी निर्मूलन दोषांचे ।।१३९।।

गुरुमुखेची व्हावे आत्मतृप्त । सद्गुरू तूंचि सर्वव्याप्त ।

व्यापक तोचि भोक्ता निवांत । वांछा किमर्थ अन्य हो ।।१४०।।

अखंड सद्गुरू स्मरण ध्यान । तेथचि माझे सान्निध्य पूर्ण ।

मग विरह नाही एकही क्षण । जाणा खूण गुरुभक्तीची ।।१४१।।

यमदंड तो यमाचाही । सद्गुरुपुढती मोडून जाई ।

इतर संकटाचा पाड काई । सद्गुरू पायी लागता ।।१४२।।

दिवस उजाडावा तो गुरुकृपेचा । बोल स्फुरावा तो गुरुस्तवनाचा ।

कर्मपसारा व्हावा परोपकाराचा । विसर विषयांचा व्हावा प्रेमात ।।१४३।।

महाकार्यी असो सोबत पुरुषोत्तम । तरीच सहजे घडती सुकर्म ।

सद्गुरूचि निवारी सर्व भवभ्रम । अंगीकारी सप्रेम दीनाते ।।१४४।।

जेथ सद्‌गुरुचे अखंड स्मरण । तेथ भगवंताचे नित्य अधिष्ठान ।

पाहुनी शिष्याचे वर्तन भजन । मनोरथ पूर्ण करीतसे ।।१४५।।

सद्गुरू परमसखा प्रेममूर्ती । त्याविन न जडे चित्त परमार्थी ।

गुरुकृपेचि वाढते सहनशक्ती । लाभत शांति ऐश्वर्या ।।१४६।।

गुरूभक्तिचे आगळे महात्म्य । सर्व समर्पणाचा अपूर्व संगम ।

सेवा भक्तिज्ञानाची हृदयंगम । त्रिवेणीसम शुद्ध परंपरा ।।१४७।।

एक सद्‌गुरू असता संतुष्ट । नुरती भयावह विघ्ने अरिष्ट ।

तोचि करी भावभक्ति पुष्ट । विकार भ्रष्ट निवारोनी ।।१४८।।

गुरुदेवा निर्मळ करा माझे जीवन । पापहर तूं अग्नितृणसमान ।

काम क्रोध लोभा भस्म करून । शांति समाधान देई मज ।।१४९।।

होता सद्‌गुरूनाथांची कृपादृष्टी । कुठे जीवनांत नुरते त्रुटी ।

सर्व साधनी समाधान पुष्टी । वर्तनी सचोटी सहज ये ।।१५०।।

सद्‌गुरू शिकविती संपत्ती लक्षमय । त्याचा प्रपंची नसावा अपव्यय ।

परि नसावी उणीव गैरसोय । नको वाय सुखासीनता ।।१५१।।

नाना पापे नाना वासना । कोण निवारी या भवविघ्ना ।

गुरूकृपाचि चुकवी जन्ममरणा । आत्मप्राप्ती ना गुरूविना ।।१५२।।

म्हणुनी सद्गुरूसी जावे शरण । तरीच नरजन्मा सार्थक जाण ।

तेणेच लभते निःसंगपण । दुरभिमान जाय लया ।।१५३।।

नाही सेवा नाही शरणागती । गुरुपायी भाव नाही संगती ।

समर्पणाविन कांही न प्राप्ती । अनुग्रह ही स्थिती प्रेममया ।।१५४।।

सद्गुरू गोविन्द हे तव दैवत । तोचि तातमात मित्र आप्त ।

कुलदैवत सद्‌गुरू पुण्यतीर्थ। गुरूविरहित स्मरू नये ।।१५५।।

अहर्निश सेवा सद्‌गुरू चिंतन। गुरुसंगतीने हो भक्तिज्ञान।

भक्तिभावे हो आत्मदर्शन। हो समाधान जीवीचे ।।१५६।।

गुरुसेवा हीच तपानुष्ठान। न करावे वाद खंडण मंडन।

अखंड श्रीगुरु नामोच्चारण। सर्व सिद्धिकारण हे ।।१५७।।

सद्गुरू तव कृपा दृष्टी। पाप जन्मोजन्मीचे निवटी।

मिटवी मळिनतेची खोड मोठी। सत्संगी उठाउठी गोडी द्या ।।१५८।।

सद्गुरूप्रीती सबाह्य कोंदटावी। मी तूं पण नुरावे चित्ताचे ठायी।

उत्तम व्यापक चिद्रुप उरावी। स्थिती चिरंजीवी चैतन्यघन ।।१५९।।

गुर्वाज्ञेचे न हो उल्लंघन। विद्वत्ताही पडे तेणे अडखळून।

गुरुवचनभंगी महाअधःपतन। प्रायश्चित्तेही शुद्धपण नाही ।।१६०।।

गुरू आज्ञेचे करावे नित्य मनन। तेणेचि जागते विवेकी ज्ञान।

संसारीचे सुखदुःख निरसन। गुरुकृपे जन्ममरण सुटे ।।१६१।।

सद्गुरू द्वारीचा मी व्हावे उंबरा। दार मीच मी दारी कुतरा।

नाम भुंकित हो द्वारपाळ निरंतरा। जाता येता पामरा पायधुळी ।।१६२।।

अंत अवघ्यासी अटळचि राही। म्हणोनि काया सेवे झिजावी।

देहे गुरुसेवा घडता सद्भावी। वास गुरुपायी मुक्तीचा ।।१६३।।

देव गुरू थोरा पुढती भाषण। कधी न करावे वृथा जल्पन।

प्रश्नही पुसावे विनम्रवचन। सर्वसत्य गुरुवचन जाणावे ।।१६४।।

स्वाध्यायी सम्यक् ज्ञान जोडावे। परमार्थी मन रमवावे।

प्रेममया जिज्ञासे वाढवावे। जीवन्मुक्त व्हावे गुरुकृपे ।।१६५।।

गर्व धरिता सद्गुरूसी। धन ज्ञान मान धरी गुरुपाशी।

सद्‌गुरूच्या देखे गुणदोषासी। सर्वदा सोशी विष्टामूत्र ।।१६६।।

सर्व काळी सर्व वेळी सहज। विसरावी देहाभिमानी लाज।

निजजीवन हो देवधर्म काज। गुरुत्राता गरज पुरवितो ।।१६७।।

सद्गुरुचे ते भजन उत्तम। तोचि परमार्थ प्रेमधाम।

अवघे धर्मार्थ मोक्ष काम। करिती विश्राम गुरुपायी ।।१६८।।

पुत्र पौत्र बन्धू मित्र आप्त। षडंगशास्त्रे कवित्व वेद।

विद्वत्ता प्रसिद्धि पांडित्य। समस्त व्यर्थ गुरुप्रेमाविना ।।१६९।।

गुरुभक्ती नव्हे हे स्वप्नरंजन। वेड्या गोडीचे ते प्रेमळपण।

अभेदभक्तीचे प्रीतीभजन। अनन्यशरण भाव तो ।।१७०।।

खुशाल करावा प्रपंच संसार। परि तो देवाहुनी नव्हे थोर।

हाचि गुरुसेवे असावा निर्धार। उद्धार निरंतर हेचि ज्ञान ।।१७१।।

सद्गुरुद्वारी करावी चाकरी। खावे प्यावे ल्यावे सर्वतोपरी।

निरभिलाषि व्हावे निरंतरी। चित्तविक्षेप परी नको नको ।।१७२।।

मुखी गुरुनाम गुरुभक्ती इन्द्रिया। गुरुपायधुळीचे लेणे भाळी या।

आठविता नाथ बिरुदावली या। तेथ सामर्थ्या काय उणे ।।१७३।।

सांडोनी सर्व वृथाभिमान। व्हावे सद्गुरूसी अनन्यशरण।

सहज साध्य तया भवतरण। सुखोर्मि पूर्ण स्वानंदी ।।१७४।।

गुर्वाज्ञापालन हेचि सत्शिष्या। तीर्थ तपे पूजा धर्मयशा।

गुरुवचनी ध्यान समाधी दशा। कल्पना निःशेषा तेथ विरे ।।१७५।।

सत्शिष्या गुर्वाज्ञा ती सर्वथोर। हाच शास्त्रनिर्णय निरंतर।

आल्हाद हृदयी असो अपार । गुरुवाक्य निर्धार पाळिता ।।१७६।।

म्हणून गुरुवाक्याचे उल्लंघन । होऊ नये सद्गुरू उपेक्षण ।

जीवनांत ते महत्पाप दूषण । तो श्वान अध:पतन तया ।।१७७।।

सद्गुरू भजावा सद्‌गुरू ध्यावा । नाथ सर्वत्र पहावा स्मरावा ।

एकरूप व्हावे धरूनी सद्भावा । पुरुषार्थ साधावा भुक्ती मुक्ती ।।१७८।।

देणे घेणे करिता व्यवहारासी । जोडिले तेणे सद्‌गुरुभक्तीसी ।

सार्थ करी गृहस्थाश्रमासी । गुरू उपदेशासी घेऊनी ।।१७९।।

सद्‌गुरू मंत्राचे पुरश्चरण । गुरुभक्तिमय अखंड आराधन ।

तोषविला तो वैकुंठरमण । मंत्रसाधन करोनिया ।।१८०।।

म्हणुनी गुरुपदी भाव धरावा । सद्गुरू तो आपुलासा करावा ।

श्रीगुरुनाथार्पण करावे सर्वस्वा । निश्चय धरावा मानसी ।।१८१।।

गुर्वाज्ञा ती सर्वप्रमाण । तदाज्ञे मग राज्यशासन ।

परी सत्तामद विषयाकारण । चित्त सावधान नुरेची ।।१८२।।

प्राकृत मनुष्यपण तेथ पाहू नये । लौकिक भावे तेथे वर्तु नये ।

गुरुप्रेमाची अवहेलना करू नये । संग धरू नये गुरुद्रोह्याचा ।।१८३।।

जैसा जैसा सद्‌गुरू आठवावा । तैसा तैसा भरे स्वानुभवा ।

तोचि आठवावा निरवयवा । देहबुद्धी अभावा धरोनी ।।१८४।।

गुरुरूप ते क्षणही न विसरावे । विसरता विकल्पाची आघवे ।

अवघा सद्भाव हो गोंधळ गोवे । अधर्मचि बळावे भ्रष्टपणी ।।१८५।।

गुरुभक्तीची चिकाटीची वाट । स्थैर्य मिळविता अति कष्ट ।

तेथ नको तार्किक वटवट । प्राप्ती अवचट होते ती ।।१८६।।

संत सद्गुरुची अघटित करणी । शरण जावे तया भाव धरोनी ।
बोधचि भरला वर्तनी वचनी । कृपाळुपणी तारी जना ।।१८७।।
वाटे अखंड आठवावे गुरू चरित । डोळा पहावा तो सद्गुरुनाथ ।
तेणे अज्ञानी मुर्ख ज्ञानी होत । अखंड गुरुपद पुजावे ।।१८८।।
गुरुचरणाचे दास्य घडावे । सेवा करिता समरस व्हावे ।
प्रवाहापतिता मज कैसे साधावे । पूर्ण व्हावे ते गुरुकृपे ।।१८९।।
जाणावे श्रेष्ठ साधना गुरुभजन । त्याविन कलीत शिष्या न समाधान ।
सद्गुरूठायी सर्व पंचायतन । सद्गुरू पंचप्राण पूजिता ।।१९०।।
जो सद्गुरूचा अनुग्रहित सेवक । तो भगवंताही प्रिय निःशंक ।
सद्गुरू निजैश्वर्य सुखदायक । जाणती देवादिक प्रत्यये ।।१९१।।
सद्‌गुरूचा जो अंकित । तो सद्गुरूचि सर्वत्र पाहत ।
असूया भेद नाठवी मनांत । समस्त निरहंकारिता ।।१९२।।
जेथ गुरुभक्तीचा जयजयकार । तेथ दुःख दैन्या नाही थार ।
काळही गुरुभक्तापुढे कापे निर्धार । निर्विकार थोर भावबळ ।।१९३।।
जो स्वीकारी गुरुभक्तिपंथ । तो सत्शिष्य हो स्वये नाथ ।
संसारी विरक्त आकळे परमार्थ । सदा अनुरक्त गुरुपायी ।।१९४।।
गुरुसेवका गुरुची ईश्वरमूर्ती । तेणे कृपे घडते ईश्वरभक्ती ।
सर्व समर्थ सर्वस्व गुरुआज्ञा ती । अवघी शास्त्रे ती गुरुवाक्य ।।१९५।।
सद्‌गुरुभक्तासी जो वैर धरी । त्याचा नाशचि हो परोपरी ।
गुरुभक्त पडे ना उघडा तिळभरी । संकटी साह्य करी गुरुनाथ ।।१९६।।
गुरुभक्ता कवचापरी गुरुभक्ती । गुरुसेवारूप ते शस्त्र हाती ।

यमदूतही तेथे पाया लागती । इतरांची गती काय ती ।।१९७।।

गुरुरूपचि जाणावा गुरुभक्त । भक्तापरी नाचत नाथ ।

हीच गुरुसंगती प्रेमळ निवांत । करा संतत गडियांनो ।।१९८।।

सद्गुरू धनी देता देवविता । तोच पूर्ण नेता नेवविता ।

सदा सर्व सर्वत्र गुरुसत्ता । 'मनोहरनाथा' अगम्य ती ।।१९९।।

'मनोहरनाथा' श्रीगुरु महिमान । आकलना न दिसे कोणते साधन ।

सर्वश्रेष्ठ ते साधन नमन । गोविन्दालागुन करीतसे ।।२००।।

## || इति श्री मनोहरनाथ विरचितम् श्री सद्गुरू विजय स्तोत्रम् संपूर्णम् ||

## || फलश्रुति ||

ऐसे हे सद्गुरू विजय स्तोत्र । जो वाचेल - स्मरेल मात्र ।

त्याचा विजय होईल सर्वत्र । येईल आरोग्य श्रीमंती ।।

राहील सद्गुरू सोबती । नांदेल भक्ती सुख शांती ।

गुरुकृपे देव दर्शन प्रचिती । निश्चितची येईल ।।

ऐसा अनुभव येथ । सत्य सांगतो जितेन्द्रनाथ ।

श्रीमनोहर देवनाथ समर्थ । अखंड कृपा करील ।।

## || श्रीगुरुनाथार्पणमस्तु ||

## || सद्गुरूनाथ महाराज की जय ||